महाराष्ट्र शासन

क्रमांक:मान्यता-२०१३/(४७/१३)/माशि-१
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक : 2 मे, २०१३

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
दिना सेवा सभा, रनाळा,
ता.कामठी जि.नागपूर

विषय :-सन २०१३-१४ या **शैक्षणिक वर्षात** सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ **इच्छिणा**-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी शाळांना परवानगी देणेबाबत....
दिना सेवा सभा, रनाळा, ता.कामठी जि.नागपूर द्वारा संचालित सँट व्हीसँट पलोटी स्कूल, रनाळा, तहसील कामठी, जि.नागपूर

संदर्भ :- १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २०.०६.२०१२.
२) शासन पत्र क्रमांक हैतूप -२०१२ /(१३६/१२)/माशि - १ दिनांक २६ नोव्हेंबर, २०१२ चे हेतूपत्र.
३) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे दिनांक २५/०२/२०१३ चे पत्र.

संदर्भ क्रमांक १ अन्वये राज्यात सी.बी.एस.ई. / आय.सी.एस.ई./ आय.जी.सी.एस.ई./ सी.आय.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ **इच्छिणा**-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करण्याकरीता राज्य शासनाकडे अर्ज केल्या नंतर सदर शाळांना हेतूपत्र (Letter Of Intent), **परवानगी** (Permission), मान्यता (Recognition) व ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) देण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शाळा सुरु करण्यापूर्वी विहित केलेल्या कार्यपध्दतीची पुर्तता करणे बंधणकारक राहणार आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्रमांक ३ अन्वये प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अर्जात नमूद केलेल्या **रनाळा, तहसील कामठी, जि.नागपूर** या ठिकाणी **सी.बी.एस.ई.** या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या **इयत्ता १ ते १० वी** पर्यंतच्या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खालील अटी व शर्तींची पुर्तता करण्याच्या **अधिन** राहून **शासन परवानगी** देत आहे.

१) सदर शाळेला भविष्यात कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.